# सामाजिक स्वास्थ्यासाठी एसआरएची गरज

## प्रधान सचिव नितीन करीर यांचे मत

**पुणे :** शहरांमधील सुमारे ४० टक्के लोकसंख्या ही आज झोपडपट्ट्यांमध्ये राहते. हे सारे नागरिक स्वखुशीने झोपडपट्टीत राहात नाहीत. शहराचे सामाजिक स्वास्थ्य सांभाळायचे असेल तर या नागरिकांना चांगले राहणीमान आणि सुविधा देणे आवश्यक आहे. यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांची गरज असून, खासगी विकासकांनी एक तरी एसआरए प्रकल्प केला पाहिजे, असे मत महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. नितीन करीर यांनी व्यक्त केले.

दांडेकर पूल परिसरातील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाचे (एसआरए) उद्घाटन आणि रहिवाशांना सदनिकांचे हस्तांतरण शनिवारी डॉ. करीर यांच्या हस्ते करण्यात आले, या वेळी ते बोलत होते. या प्रसंगी महापालिका आयुक्त सौरभ राव, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक पाटील, पुणे महापालिकेचे सभागृह नेते श्रीनाथ भिमाले, नगरसेवक धीरज घाटे, स्मिता वस्ते, सरस्वती शेंडगे आदी उपस्थित होते. करीर म्हणाले, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण अर्थात एसआरएची स्थापना ही १४ वर्षांपूर्वी झाली. त्यावेळी क्रेडाईने मशाल या सामाजिक संस्थेच्या मदतीने शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये एक सर्व्हे केला गेला. त्याची एक पुस्तिकाही छापली. त्यानंतर एसआरएने याचे गणित मांडीत ते विकासकांसमोर ठेवणे अपेक्षित होते. मात्र, तसे झाले नाही.

### एकत्र येऊन प्रकल्प हाती घ्यावा

झोपडपट्टीमध्ये राहणारे नागरिकदेखील शहराच्या अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाचे आहेत. बांधकाम व्यावसायिकही शहराचा भाग असून, त्यांनी शहराच्या विकासात योगदान द्यायला हवे. आज बांधकाम क्षेत्राची परिस्थिती तितकीशी चांगली नाही, याची कल्पना आहे. मात्र, तरीही तीन ते चार बांधकाम व्यावसायिकांनी एकत्र येऊन एसआरए प्रकल्प हाती घेणे गरजेचे आहे, असेही डॉ. करीर यांनी या वेळी नमूद केले.